रयत शिक्षण संस्थेचे

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर

## भूगोल विभाग

# ७- शेती पूरक व्यवसाय आणि कृषी विकास

कृषी भूगोल, टी. वाय. बी.ए.

**मार्गदर्शक: प्रा. विकास मिंडे**

Geography

AGRICULTURE

# शेती पूरक व्यवसाय आणि कृषी विकास

## शेती पूरक व्यवसायांची गरज

- कृषी व्यवसाय निसर्गाधीन राहून करावा लागत असल्याने त्यात शेतक-यास खूप जोखीम स्वीकारावी लागते.
- या व्यवसायात सतत चढ उतार होत असते.
- जोडधंदा करून व नवीन तंत्रज्ञानाचा स्विकार करून शेतीमधील जोखीम कमी करता येते.
- भारतीय शेतीने मागील काही काळामध्ये हरितक्रांतीचा स्वीकार करून, आधुनिक जलसिंचन, खते- संजीवके व किटकनाशकांची उपयुक्तता या सर्वांच्या मदतीने शेतीचे उत्पादन वाढवीले आहे.
- पूरक व्यवसायांच्या मदतीने शेतीला स्थैर्य प्राप्त होऊ शकते.
- कोरडवाहू शेती व शेतक-यास आधार मिळेल.
- रोजगार निर्मिती होईल.
- अन्नसुरक्ष व आरोग्यदायी आहार मिळेल.

# शेती पूरक व्यवसाय

| | |
|---|---|
| **१. दुग्धोत्पादन व्यवसाय** | • धवलक्रांती<br>• दुग्धोत्पादन व प्रादेशिक वितरण |
| **२. कुक्कुटपालन** | • कुक्कुटपालनातील उत्पादने<br>• भारतातील कुक्कुटपालन |
| **३. मेंढी व शेळीपालन** | • मेंढी पालन<br>• शेळीपालन |

# शेती पूरक व्यवसाय

| | |
|---|---|
| **४. रोपवाटिका व्यवस्थापन** | • प्रस्तावना<br>• महत्व |
| **५. मधुमक्षिका पालन** | • प्रस्तावना<br>• रचना |
| **६. मत्स्यशेती** | • मत्स्य प्रजाती<br>• मत्स्य शेती प्रकार |
| **७. कृषी पर्यटन** | • प्रस्तावना<br>• वैशिष्ट्ये |

# कृषी विकासासाठी नवतंत्रज्ञान



ऊती संवर्धन

अन्न व फळ प्रक्रिया





पॉली हाऊस

# दुग्धोत्पादन व्यवसाय (Dairy Farming)

दुग्धोत्पादनाचा व्यवसाय हा एक परंपरागत शेतीचा अविभाज्य भाग आहे. पण सध्या तो एक स्वतंत्र शेती पूरक व्यवसाय म्हणून प्रस्थापित झाला आहे. शीतकरण, यांत्रिकीकरण, विशेष वाहतूक साधने व वाहतूकीच्या सोयी यामुळे दुग्धोत्पादनास चांगले यश मिळाले आहे. व्यापारी दुग्धोत्पादन ही समशीतोष्ण कटिबंधातील प्रगत देशांची मक्तेदारी असली तरी भारत आता जगातील प्रथम क्रमांकाचा दूध उत्पादक देश झाला आहे.

**दूध उत्पादन :महत्वाचे देश (२०१२-१३)**

| देश | दूध उत्पादन (द.ल.टन) |
|---|---|
| युरोपीय युनियन | १४०.६ |
| भारत | १३२.४ |
| यु.एस.ए. | ८८.४ |
| चीन | ३१.८ |
| ब्राझिल | ३०.८ |
| जग एकूण | ७२३.१४ |

दुग्धोत्पादनात भारत जरी प्रथम क्रमांचा देश असला तरी प्रत्येक दुधाळ जनावरापासून मिळणाया दुधाचे प्रमाण प्रगत देशांच्या तलनेत कमी आहे. न्युझिलंडमधील एका गायीपासून मिळणाया दुधाच्या केवळ वीस टक्के दुध भारतातील गाय देते.

# धवलक्रांती (White Revalution)

- भारतामध्ये दूध उत्पादनास चालना मिळावी म्हणून सन १९७१ मध्ये नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड या संस्थेने दुग्धोत्पादन विकास प्रकल्प सूरु केला. दुधउत्पादनातील तज्ज्ञ डॉ. वर्गिस करीयन हे या प्रकल्पाचे जनक होते म्हणून त्यांना मिल्कमन ऑफ इंडीया असे म्हणतात.
- धवलक्रांतीची उद्दिष्टे :
- दूध उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ साध्य करणे.
- ग्रामीण भागात रोजगार व उत्पन्न वाढीचे प्रयत्न करणे.
- ग्राहकांना रास्त भावात दूध उपलब्ध करून देणे.

- धवलक्रांतीचा पहिला टप्पा : या योजनेचा पहिला टप्पा सन १९७१ ते ८० या कालखंडामध्ये राबविण्यात आला. दूध उत्पादक सहकारी संघ स्थापन करणे, दूध उत्पादनाबाबत सेवा-सुविधा पूरविणे, दूध संकलनाची यंत्रणा उभी करणे, भारतीय गायी-म्हशींचे दूध उत्पादन वाढविण्यासाठी त्यांना सकस खाद्य निर्माण करणे हे या योजनेचे मुख्य घटक होते. या योजनेचे फलीत म्हणजे १९८०-८१ मध्ये भारतामध्ये ३२ द.ल. टन दूध उत्पादन झाले.
- धवलक्रांतीचा दुसरा टप्पा : या योजनेचा दुसरा टप्पा स.न. १९८१ ते ८५ असा पाच वर्षाचा होता. या काळात देशातील गावागावांमधून ४३००० दूध सहकारी संस्था स्थापन झाल्या. दूध संकलन करणे, वाहतूक व वितरणाचे जाळे निर्माण केले. याच काळात या उद्योगासाठी लागणारी यंत्रसामग्री, उपकरणे, शीतकरण, शीतपेट्यायुक्त वाहने, दूध भरणारी यंत्र, दूध प्रक्रिया यंत्रे निर्माण करण्यात आली.
- धवलक्रांतीचा तिसरा टप्पा : या योजनेचा दुसरा टप्पा स.न. १९८५ ते ९६ असा दहा वर्षाचा होता. या टप्प्यामध्ये पायाभत सुविधा सक्षमीकरण, व्यवसाय विस्तार, पशुवैद्यकीय सेवा, कत्रिम रेतन सेवा, सल्ला देणे, कौशल्यविकास, प्रशिक्षण या गोष्टी साध्य करण्यात आल्या. याच काळात मुंबई, पुणे, अहमदाबाद, कर्नाल, कानपूर, चेन्नई, बंगरूळ व दिल्ली येथे दूध उत्पादन प्रक्रिया व संशोधन केंद्रे सूरू करण्यात आली.

# गोवर्धन उद्योग समूह

https://www.youtube.com/watch?v=DdwXzd--cJA




एका मुलीची यशोगाथा

https://www.youtube.com/watch?v=zPSAg4tMy2k

# धन्यवाद

